# प्रकरण चौथे

## *उपसंहार व निष्कर्ष*

# उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत लघुशोध निबंधामध्ये विषयाची मांडणी चार विभागात केली आहे. विष्णू आणि विष्णूच्या अवतार मूर्तींचा अभ्यास सोलापूर जिल्हयातील शक्य तेवढ्या तालूक्यातील मूर्तीचा आढावा घेऊन केला आहे. प्रत्यक्ष विष्णू मूर्तींचा अभ्यास करण्यापूर्वी. मूर्तीशास्त्र म्हणजे काय ? मूर्ती प्रकार कसे पडतात ? मूर्तिपूजा कशी आली ? मूर्तीची लक्षणे कशी असतात ? मूर्तीचा कालखंड कसा ओळखावा ? असे अनेक प्रश्न मनात उपस्थित झाले त्यासाठी या सर्व तांत्रिक बार्बीचा शास्त्रशुद्ध अभ्यास अनेक संदर्भ ग्रंथाचा संदर्भ घेऊन केला. या तांत्रिक ज्ञानाच्या सामुग्रीच्या आधारावर सोलापूर जिल्ह्यातील अनेक स्थळांना ( मंदिरे, ग्रामदैवते, किल्ले, पुरातत्वीय स्थळे, ऐतिहासिक भग्नावशेष आढळणारी स्थळे, इ.) भेटी दिल्या, मूर्तीचा प्रत्यक्ष बारकाईने अभ्यास करुन छायाचित्रे घेतली. तेथील लोकांशी सुसंवाद साधला. धार्मिक ऐतिहासिक संदर्भ जाणून घेतले. उपासनेचे रीतीरिवाज जाणून घेतले. अशा रीतीने अनेक मूर्तीची माहिती जमविली. संदर्भ ग्रंथातील टिपणे. प्रत्यक्ष भेटींचे कच्चे वृतांत छायाचित्रे व संगणक यांच्या साह्याने मूर्ती वैशिष्ट्ये जाणून घेतली त्यावरुनच हा लघुशोध निबंध तयार केला आहे.

पहिल्या विभागात प्रत्यक्ष विष्णूमूर्तीचा अभ्यास करण्यासाठी प्रथमतः मूर्तिकला व मूर्तिशास्त्राचा आढावा घेणे जरुरीचे होते. हा विष्णूमूर्ती अभ्यासाचा प्रथम सोपानच होता त्यासाठी पहिल्या विभागात मूर्ति विज्ञानाचा आढावा घ्यावा लागला. एखादी गोष्ट मनात असते, ती साकार करण्यासाठी म्हणजे तिथे दृष्यरुप बनविण्यासाठी ती व्यक्त करण्यासाठी जी अभिव्यक्ती असते ती म्हणजेच कला. इतिहासाच्या या विकासा बरोबर कला कधी उदयाला आली ते सांगणे कठीणच जाईल. पण माणसाच्या बुध्दीचा विकास जसा होऊ लागला तस तशा या कल्पना त्याच्या मनात आकार घेऊ लागल्या. प्रथमतः निसर्गातील गोष्टींनाच मानवाने देवस्वरुप मानले होते. वैदिक काळात यज्ञाला प्राधान्य दिलेले होते. देवाला द्यावयाचे पदार्थ

अग्नीला दिले तर ते देवापर्यंत पोहचतात अशी त्यांचा दृढनिष्ठा होती. त्यांनी इंद्र वरुण आदित्य असे देव कल्पिले . त्यामुळे त्या काळात अजून मूर्तिपूजा नव्हती असेच म्हणावे लागते. उपनिषद काळात परब्रम्हाची कल्पना रुढ झाली. देवतास मानवी रुपे आहेत तो सगुण साकार आहे, निर्गुण निराकार आहे अशी वेगवेगळी मते मांडली जात होती.

परंपराप्रियता हा हिन्दु धर्मीयांच्या स्वभावातील मूळ घटकच आहे. परंपरेशी धागा जुळणा-या विचार सरणी मानवाने वेळोवेळी स्विकारलेल्या आहेत, त्यामुळे मूर्तिपूजा हे हिन्दूधर्मातील महत्वाचे अंग समजले जाऊ लागले. वेदकाल हाच प्राचीन काळ समजला जात होता पण त्या पेक्षा ही एक जुनी संस्कृती अस्तित्वात आहे याचा शोध लागला. सर्वात प्राचीन म्हणून ओळखल्या जाणा-या सिंधू संस्कृतीवर प्रकाश पडला आणि त्याकाळातही मूर्तिपूजा आस्तित्वात होती हे लक्षात आले. त्या काळी मातीच्या मूर्ती बनवित असत हे पुराव्यानिशी सिध्द झाले. म्हणजे भारतीय मूर्तिकला फारच प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे हे समजते. श्री.म.श्री. माटे यांच्या मते तर सिंधू संस्कृतीच्या आधीपासून मृण्मयी मूर्ती बनत आहेत. पुराणांनी तर मूर्तिकलेला उचलून धरले. कारण अनेक पुराणांमध्ये मूर्तीकलेच्या विविध अंगांची माहिती दिलेली आहे. प्रतिमा लक्षण , प्रतिमा प्रतिष्ठा, देवता गृह निर्माण अशा अनेक विषयावर त्यात चर्चा केली आहे. मूर्तीशास्त्राने मूर्तीचे विविध प्रकार योजलेले आहेत. त्यात प्रामुख्याने काष्ठमूर्ती, मातीच्या मूर्ती, धातू मूर्ती, पाषाण मूर्ती अनेक अनेक प्रकार मांडले जातात. प्रस्तृत अभ्यास करीत असताना जास्तीत जास्त उपलब्ध होणा-या म्हणजे पाषाण मूर्ती. या पाषाण मूर्तीचाच अभ्यास केलेला आहे. सर्वात जास्त आढळण-या मूर्ती पाषाण मूर्तीच असतात. फक्त उत्सवमूर्ती म्हणून ज्या मूर्ती आढळतात त्या मूर्ती मात्र जास्तीत जास्त धातूच्या असतात, आणि पितळ या धातूच्याच असतात. क्वचीत तांब्याच्या असतात.

या पाषाण मूर्तीत देखील अनेक प्रकार पडतात. चल, अचल, चलाचल, अशीही वाटचाल आहे. या मूर्तीना वेळोवेळी काळाने प्रभावित केले आहे त्यामुळे काळानुरुप त्यात बदल घडत गेले. मूर्तीमध्ये स्थानक, आसन, शयन असे प्रकार त्यांच्या स्थितीवरुन पडतात. तर त्यांच्या उभ्या राहण्याच्या पध्दतीवरुन समभंग, आभंग, त्रिभंग, अतिभंग असे प्रकार केले जातात. मूर्तीतील सौंदर्य मूर्तीमंत उभे करण्याचा कलाकार प्रयत्न करीत असतो. कलाकार हा

त्या कालखंडाचा प्रतिनिधीच असतो असे म्हणावे लागेल. कारण त्याची निर्मिती तत्कालीन काळाचे प्रतिबिंब दर्शविणारी कलाकृती असते. त्यामुळे त्याला कालानुरुप अशी कलाकृती निर्माण करावी लागते कारण आज आपण त्या कलाकृतीवरुन मूर्तीचा कालखंड ठरवितो मूर्तीच्या सौंदर्याचे सामर्थ्याचे प्रतिपादन करण्यासाठी त्या मूर्तीची बैठक विशिष्ठ प्रकारे असावीच लागते. आणि तशा प्रकारची घडण करुन ती बसलेली दाखविणे यालाच आसन म्हणतात. देवतेच्या अवस्था मानवाच्या अवस्थांहून भिन्न असतात हेच येथे सूचित करावयाचे असते. उदा. उंच पीठावर बसून दोन्ही पाय लोंबते सोडले तर त्या आसनाला भद्रासन म्हणतात. खूप मूर्ती पाहिल्यावर लक्षात आले की लक्ष्मीनारायणाची जी मूर्ती असते त्यातील लक्ष्मी ब-याच वेळा भद्रासनातच असते. वराह अवतारात श्री विष्णू आलीढ मुद्रेतच असतात हे खूप मूर्ती पाहिल्यावर आपोआपच समजू लागते. आसना प्रमाणेच हस्तमुद्राही आहेतच. हाताचा तळवा व बोटे नेहमीच भिन्न प्रकारच्या अवस्था दर्शवू शकत असतात. मूर्तीची जी विशीष्ठ परिभाषा आहे, त्यांना मुद्रा असे म्हणतात मुद्रा किंवा हस्त भिन्न प्रकारात दाखवून भिन्न भिन्न कृतींचा बोध करुन देणे हे तर भारतीय मूर्ती शिल्पांचे वैशिष्ट्य आहे. उदा. श्री विठठल मूर्तीचे हात नेहमी कट्यवलंबीतच असतात. तर मुख्य मूर्ती जवळ असलेली इतर पात्रे ब-याच वेळा नमस्कार मुद्रेतच असतात. प्रत्येक देवतांची वाहने, आयुधे ही ठरलेलीच असतात. धनुष्य हे अतिप्राचीन आयुध हातात असेल तर ती श्रीरामांची मूर्ती आहे, हे कळण्यास वेळ लागत नाही. गरुड हे विष्णूचे वाहन आहे, आणि त्यावर श्री लक्ष्मी सहीत भगवान विष्णू आरुढ झालेले दिसतात.

याचबरोबर मूर्तीच्या अंगावरील अलंकरणानही विशेष महत्व दिले जाते. प्राचीन कालीन मूर्तीच्या अंगावर अलंकरणे तितकीशी असत नाहीत परन्तु मध्ययुगात मूर्तीना नखशिखान्त अलंकृत करण्याची प्रथा सुरु झाली आणि मूर्ती अलंकरणांनी नटलेल्या दिसू लागल्या. त्यातही विष्णूमूर्तीची अलंकरणे वैशिष्टय पूर्ण असतात. वैजयंतीमाला, श्रीवत्सचिन्ह ही खास करुन विष्णूचीच अलंकरणे आहेत. असे हे मूर्ती वैभव म्हणजे संस्कृती वैभवच आहे. ते मूर्तीद्वारे दृष्य स्वरुप होऊन आपल्यासमोर येते. ही मूर्तिकला कधी सुरु झाली हा यक्ष प्रश्न आपल्याला सतावितच राहतो. मौर्य कालाच्या प्रारंभापर्यंतच्या कालखंडाला 'महाजनपदयुग' म्हणतात. देवतांची वाढ याच काळात झाली. ८ ते १० हात उंचीच्या पाषाण

मूर्ती याच काळात मिळतात. परखम नावाचा यक्ष इ.स. पूर्व सातव्या शतकातल असून भारतीय मूर्ती शिल्पात हाच पुतळा प्राचीन मानला जातो. मौर्या नंतरच्या शुंग काळात माती आणि पाषाण या दोहोंच्याही मूर्ती बनू लागल्या. त्यांच्या पोषाखा वरुन त्या वेगळया ओळखता येऊ लागल्या. कुषाण काळातील मूर्तिकला गांधार शैलीतील देशी - विदेशी अशा मिश्र छापाची होती परन्तु त्यानंतर अवतरलेल्या मथुरेची मूर्तिकला मात्र शुध्द भारतीय बनली. पुढे गुप्त युगात भारतीय मूर्तीकलेचा परमोत्कर्ष झाला.

दुस-या विभागात प्रत्यक्ष विष्णूमूर्ती पाहताना कुषाण काळापूर्वीच्या विष्णूप्रतिमा अस्तित्वात नाहीत असे म्हटले जात असले तरी पूर्वीच्या नाण्यावर विष्णूचे दर्शन घडतेच. कुषाण कालीन विष्णूप्रतिमाचे एक सर्वमान्य रुप होते. त्या आकाराने लहान असत व इकडे तिकडे हालविण्यास सोप्या असत. शुंग काळात यक्ष यक्षिणींच्या मूर्तीना जणू काही बहर आलेला होता. त्यामुळे या काळातील विष्णू प्रतिमेची घडण यक्ष प्रतिमेवर आधारलेली होती. अभय मुद्रेत उचलेला उजवा हात व कमरेवर ठेवलेला डावा हात समभंग स्थितीत उभे राहण्याची पध्दत ,मोजके अलंकार ही वैशिष्टये कुषाण काळात दिसतात. द्विभूज मूर्ती क्वचीतच आढळतात. कुषाण काळात दर्शनी भागा प्रमाणे मागच्या भागालाही महत्व असे पाठीचे सुंदर अंकन केलेले असते .पाठीवर रुळणारा केशसंभार अथवा एखादा वृक्ष दिसतो.

गुप्तकाळात मात्र मूर्तिशास्त्राचा विकास झला. मूर्तीच्या शारीरिक सौंदर्याकडे लक्ष वाढले. अंगावर मोजके दागिने ,अलंकृत प्रभामंडळ ,नाजुक कोरीव कान, तलम वस्त्रे आली . शंख,चक्र, गदाधर अशी प्रतिमा बनू लागली. कमळाचे अस्तित्व दिसत नव्हतेच' पुढे कालांतराने कमलदर्शन झाले. शंख, चक्र, गदा,पदम ही आयुधे चार हातात दिसू लागली आणि या आयुधाच्या स्थान परिवर्तनानुसार विष्णूच्या चोवीस प्रकारच्या मूर्ती घडविल्या जाऊ लागल्या.

मूर्तीच्या प्रकारात स्थानक , आसन, शयन, यानक असे प्रकार रुढ झाले. सामान्यत: मनुष्य उभा, बसलेला, निजलेला या तीन स्थितीत असतो त्यावरुन हे वर्णभेद कल्पिलेले आहेत. प्रामुख्याने हे वरील वर्णभेद श्री विष्णूंच्या मूर्तीसच जास्त लागू आहेत. त्याच बरोबर योग, भोग, वीर, अभिचारक असे उप प्रकार पडले आहेत.कालानुरुप विष्णूची अवतार कल्पना

प्रभावित झाली. अवतारांच्या संख्येविषयी फार काळ एकमत होत नव्हते आजही पुराणंमध्ये अवतार संख्या वेगवेगळया आढळतात. पुढे सर्वमान्य अशा दहा अवतारांना मान्यता मिळाली.विष्णू अवतारांची दहा ही संख्या लोकप्रिय झाली. दहा अवतारात

दोन जलचर - मत्स्य, कूर्म.

दोन वनचर - वराह, नरसिंह

दोन ब्राम्हण - वामन, परशुराम

दोन क्षत्रिय - राम, कृष्ण

बुध्द व पुढे होणारा कल्की

अशी अवतारांची विभागणी आढळते व ती सर्वमान्यही आहे. मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौध्द, कल्की हे दशावतार आहेत. या दशावतरांचा नामोल्लेख हजारो वर्षापासून मिळतो. परन्तु संख्येच्या नियमानुसार गुप्त काळाच्या आसपासच प्रारंभ होतो, असे म्हटले तर अवतार मूर्ती कुषाण काळातच दिसू लागल्या होत्या.

पौराणिक दृष्टीकोनातून पाहिले तर दहा अवतारांचे विभाजन

सत्ययुग - मत्स्य,कासव, वराह, नरसिंह

त्रेतायुग - वामन, परशुराम, दाशरथी राम

द्वापारयुग - कृष्ण किंवा बलराम

त्रेतायुग - बुध्द , कलकी , असे केलेले दिसते.

दहा अवताराखेरीज हयग्रीव मधूकैटभारी, करिवरद , धन्वन्तरी हेही अवतारच आहेत.

अवताराखेरीज ही शेषशायी, विठ्ठल, व्यंकटेश, असे प्रकार आहेतच.

त्यामुळे विष्णूंच्या प्रतिमांची तीन प्रकारात विभागणी केली.

१) साधारण मूर्ती

२) अवतार मूर्ती

३) असाधारण मूर्ती

विष्णूचे जे मूळ रुप आहे अशा विष्णूमूर्तीना निजमूर्ती म्हणतात. तेव्हा साधारण मूर्ती म्हणजेच निजरुप मूर्ती असे कल्पून ज्या प्रत्यक्ष विष्णू मूर्ती आहेत त्यांची गणना साधारण मूर्तीत केली.

दशावतरांची गणना अवतार मूर्तीत व शेषशायी, श्री विठ्ठल, व्यंकटेश अशा मूर्ती की ज्या निजरुप मूर्ती नाहीत किंवा अवतार मूर्ती ही नाही अशांची गणना असाधारण मूर्तीत केली. हरिहरासारख्या मूर्तींची गणना यात झाली. इथपर्यंत प्रचीन कालखंड संपत येतो. आणि सहाव्या शतकानंतर आपण मध्यकाळात येतो आणि काळाबरोबर मूर्तीतही बदल झालेले आपल्याला दिसतात. विविधतेने नटलेल्या मूर्ती दिसू लागतात. या काळात ज्या मूर्ती बनू लागल्या त्या पाठशिला युक्त होत्या. मूर्ती पाठशिलायुक्त असल्यातरी आजुबाजूच्या इतकेच कोरीव काम केले जाऊ लागले. पाठशिलेवरील मुख्य मूर्ती जवळच्या इतर मूर्तीत हे फरक होऊ लागले. वाहिकेवर मध्यभागी कमळ दिसू लागले. महांबूजपीठ या नावाने ओळखले जाऊ लागले. एकंदर पाठशिले वरील सर्वच कलाकृतीत बदल झाले.

विष्णू मूर्तीची विविधता अजमावण्यासाठी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी चार विभाग पडले.

अकराव्या बाराव्या शतकात बंगाल मध्ये विष्णू भक्तीचा मोठया प्रमाणावर प्रसार झाला मूर्तिकलेबरोबर वाङमयाला देखील बहर आला होता. मुख्यत्वे करुन विष्णूच्या प्रतिमा समभंग स्थितीत बनू लागल्या होत्या .महत्वाचा बदल म्हणजे मुख्य मूर्तीबरोबर परिवार देवता दिसू लागल्या. विष्णू प्रतिमेचा चेहरा वैशिष्टयपूर्ण् असे. चेहरा सौम्य व लोभस नाक डोळे हनुवटी अतिशय तरतरीत. त्यामुळे हया योगमूर्ती अतिशय सुंदर दिसतात. अवतार प्रतिमातही बदल झाले पश्चिम आणि मध्यभारतीय कलेत उत्तर दक्षिण कलेचा संगम झालेला दिसतो. रथिकाबिंबे नाहीशी झालेली दिसतात. मूर्ती अलंकरणानी अलंकृत झालेल्या दिसतात. उत्तर भारतीय कलेतील मूर्ती चतुर्भूज असून प्रलम्बबाहू आहेत. दागिन्यामध्ये मुकुट त्रिश्रृंग असतो. दक्षिण भारतीय कलेत दागिने विपूल झाले.

तिस-या विभागात स्वतः पाहिलेल्या मूर्ती, व त्याबरोबर त्यांची मिळविलेली माहिती छायाचित्रे यांचा उल्लेख येतो. पूर्ण जिल्हयामध्ये फिरुन शक्यतितक्या ठिकाणांना भेटी दिल्या त्याच वेळी या संक्षिप्त करुन घेतलेल्या विषयाचा अवाका किती मोठा आहे ते जाणवू लागले. आणि भेटी देताना अनेक अडचणी, अनेक प्रश्न उपस्थित होत होते. सुरुवातीलाच पहिली गोष्ट खटकली ती म्हणजे ब-याच ठिकाणी मूर्तींची छायाचित्रेच घेऊ दिली जात नाहीत.

शेवट पर्यंत छायाचित्रे दिलीच नाहीत अशा मूर्तिंचा उल्लेख या लघुशोध निबंधात केला नाही .काही ठिकाणी मूर्तींना सुंदर पोषाख असतात. एकदा सकाळी हा पोषाख चढविला की दुस-या दिवशी पर्यंत तो तसाच ठेवतात. त्यामुळे आपल्याला मूळ मूर्तीची कल्पना येऊ शकत नाही.शक्य झाले तेथे असे सकाळी जाऊन छायाचित्रे घेतली पण बरीचशी छायाचित्रे वस्त्रासहीत घेतलेली आहेत पण माहित नव्हते. वर्षानुवर्षे पाहिलेली आमच्याच गावातील रामाची मूर्ती ब-याच वेळी असाही अनुभव आला की ब-याच ठिकाणी मूर्ती बाहेरच उघडयावर पडलेल्या असतात. त्यांच्याकडे कुणांचे लक्षही नसते त्यांची देखभालही होत नाही की नित्यपूजा अर्चा सुध्दा नसते . .आपल्या भारतीय संस्कृतीचा हा ठेवा जतन करण्याची किती गरज आहे . या मूर्तीवर किती तरी पुटे बसलेली असतात त्या मूर्ती स्वच्छ करुन त्यांची छायाचित्रे घ्यावी लागतात . सोलापूर जिल्हयात वरवर पाहिले तर जास्त शिवमंदिरेच आढळतात ऋग्वेदात तर सुरुवातीला विष्णू ही क्षूद्र देवता मानली आहे पण ऋग्वेदातच विष्णूचा त्रिपाद विक्रम गौरविला आहे.

पुराणांनी वैदिक धर्म व वैष्णव धर्म यांची सांगड घालूना हिन्दु धर्माचा पाया घातला.तसेच सोलापूर जिल्ह्यात शैव आणि वैष्णव धर्माचा समन्वय आढळून येतो याचेच प्रतीक म्हणजे सोलापुर जिल्ह्यात आढळणा-या हरिहराच्या मूर्ती होत . अशा मुर्ती कर्नाटक सिमेवरील अक्कलकोट येथे ,सोलापुर येथील किल्ल्यामध्ये आढळतात. नुकत्याच डेक्कन कॉलेज, पुणे व शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर केंद्राच्या वतीने झालेल्या मंगळवेढा तालुक्यातील सिद्धापूर येथे केलेल्या उत्खननात वैशिष्ट्यपूर्ण हरिहराची मूर्ती सापडली आहे . यावरून उत्तर भारतातील वैष्णव आणि दक्षिण भारतातील शैव पंथांचा मिलाप सोलापूर जिल्ह्यात झालेला आढळतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विष्णू शिव यांच्या पूजनाला भक्तीला प्राधान्य देणा-या शैव वैष्णव इ. पंथाच्या प्रसाराला सुरुवात झाली. शिव व विष्णूची निरनिराळी मंदिरे निर्माण झाली.

सोलापूर जिल्हयात फिरताना अनेक गोष्टी नजरेत आल्या. प्रचलित असलेली भव्य शिव मंदिरे पाहिली तर या जिल्हयात शैव धर्माचा पगडा अधिक आहे असे वरवर दिसते. उदा. चपळगावच्या पुरातन मल्लिकार्जून मंदिराच्या कक्षासनावर विष्णू प्रतिमा आढळते आणि शिव व वैष्णवाच्या अद्वैताची इथेच साक्ष पटते. जेऊरला काशीविश्वेश्वरांच्या मंदिरात शेषशायी विष्णूच्या दोन अतिशय सुंदर मूर्ती आढळतात. काशी विश्वेश्वराचे मंदिर जितके पुरातन आहे तितक्या हया शेषशायी या मूर्ती ही जुन्याच आहेत. शैव व वैष्णव यांच्या मधील संघर्षमय वाद योग्य नही हे स्पष्ट करण्यसाठी संत तुकाराम म्हणतात. -

हरिहरा भेद । नाही करु नये वाद ।।
एकएकाचे हृदयी । गोडी साखरेच्या ठायी।।
भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ।।
उजवे वाम भाग । तुका म्हणे एकच अंग ।।

या वादाचीच निरर्थकता दर्शविणरे एक स्थान सोलापूर जिल्हयातच करमाळा या ठिकाणी आढळले . संगोबा हे त्या ठिकाणांचे नाव आहे. तेथीलच एका विठठल भक्ताला श्री शंकरांनी दर्शन दिले ते वैष्णवाच्या रुपात, आणि श्री विष्णू तो मीच आहे याची खात्री करुन दिली. मग शैव व वैष्णव हा भेद राहतोच कुठे? हे अद्वैत पंढरीच्या विठठलातही दिसते. विठठलाच्या डोक्यावर शिवाची पिंडी आहे. जो माझी भक्ती करतो त्याला मी अक्षरशः मस्तकावर धारण करतो असे प्रत्यक्ष भगवानच म्हणतात . पंढरीच्या श्री विठठलाच्या राजस सुकुमार मूर्तीच्या मस्तकावर याच मूर्तीशी एकरुप झालेली शिवपिंड आहे. म्हणजे शिवाला श्री विठठलाने खरोखरच मस्तकावर घारण केले आहे. बार्शीच्या भगवंताच्या मूर्तीत देखील हेच अद्वैत साधलेले आहे. प्रत्येक ठिकाणच्या ग्रामदैवतावरून तिथला पंथ ओळखला जात असलातर शैव धर्माचा प्रसार अधिक झाला आहे असे वाटते. पण हे शैव व वैष्णवाचे ऐक्य पाहिल्यावर तसे म्हणता येत नाही.

मूर्तीचा शोध घेतांना एक गोष्ट लक्षात आली ज्या काही निजरुपी मूर्ती आढळल्या त्या प्राचीनच होत्या हिरज सारख्या छोटयाशा गावात एकच देवीचे मुख्य मंदिर आहे. त्या मंदिराच्या मागे प्राचीन वैष्णव शिल्प उपेक्षितपणे उभे आहे. मार्डी या ठिकाणी एकाच ठिकाणी दशावतारातील बरेच अवतार आहेत. त्यातही एक निजमूर्ती आहे. प्रत्यक्ष निजमूर्ती कमीच आढळतात. अवतार मूर्ती असाधाण मूर्ती त्या मानाने जास्त आढळतात. अवतार मूर्तीतही ठराविक अवतार जास्त आढळतात. त्यात विठ्ठल या असाधारण मूर्तीच्या किंवा राम अवतारातल्या प्रतिमा अधिक आढळतात. ब-याच गावात किमान एक तरी रामाचे मंदिर असतेच विठठल मूर्तीचेही तसेच आहे. वराहमूर्ती सारख्या दुर्मिळ मूर्ती अक्कलकोट सारख्या ठिकाणी एखादीच मिळते. तर मत्स्य, कूर्म, वामन हे अवतार प्रतिमांच्या रुपात आढळत नाहीत श्रीकृष्णाचीही विविध रुपे आढळतात पण त्या मानाने श्री विष्णूच्या योगमूर्ती कमीच सापडतात. शिव आणि वैष्णवाचे ऐक्यच दाखविणा-या विठठल मूर्ती मात्र जास्तच आढळतात. पंढरपूरची ही विठठलमूर्ती हाच भक्तीचा संदेश देते. या वारकरी संप्रदायाचा पगडा नाही म्हटले तरी अवघ्या महाराष्ट्रावरच बसलेला आहे. मग सोलापूर जिल्हयावर का पगडा का असणार नाही पण हा वैष्णव वारकरी जेंव्हा भक्तींने पंढरीची वारी करतो तेव्हा तितक्याच तन्मयतेने तो शिवाशी् समरस होतो. हिव-यासारख्या नागोबाची महती सांगणा-या या मंदिरात शिवलिंग आहे आणि आवारातच विष्णू. लक्ष्मीनारायण आढळतात हे ऐक्य जनमानसात रुजले आहे. वैविध्यपूर्ण हरिहराच्याही मूर्ती सापडतात. तर नरसिंह अवताराच्याही प्रतिमा आढळतात. हे ऐक्य भक्ती धर्माचा प्रसारच करते आणि सर्वधर्म समभावचे बीजच पेरते असे म्हणवयास हरकत नाही.